महाराष्ट्र पोलीस
# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५ /२०२४ दि. २८/०१/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २८/०१/२०२४ रोजी आप्पा दातार चौक येथे **'रोटरी क्लब ऑफ डोंबिवली रिजन'** तर्फे **'हॅप्पी स्ट्रीट'** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात नागरिक मोठया संख्येने सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) ठाकुर्ली जोशी हायस्कूल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणपती मंदिर गेटजवळ नेहरू रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाकुर्ली जोशी हायस्कूल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणारी वाहने सरळ येवून टिळक रोडने मदन ठाकरे चौक येथून पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) छेडा रोड कडून आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तुळशी स्वीट कॉर्नर छेडा क्रॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** छेडा रोड कडून आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणारी वाहने सरळ येवून टिळक रोडने मदन ठाकरे चौक येथून इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २८/०१/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते १०:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर –**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण.

CamScanner

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner